N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल
(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. District (जिल्हा): जळगाव P.S. (पोलीस ठाणे): जामनेर Year (वर्ष): 2026

FIR No. (प्रथम खबर क्र.): 0005 Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 07/01/2026 21:00 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):

1 Day (दिवस): बुधवार Date from (दिनांक पासून): 07/01/2026 Date To (दिनांक पर्यंत): 07/01/2026

Time Period (कालावधी): प्रहर ५ Time From (वेळेपासून): 13:55 तास Time To (वेळेपर्यंत): 13:55 तास

(b) Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा): Date (दिनांक): 07/01/2026 Time (वेळ): 20:45 तास

(c) General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ): Entry No. (नोंद क्र.): 029 Date and Time (दिनांक आणि वेळ): 07/01/2026 20:45 तास

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी

5. Place of Occurrence (घटनास्थळ):

1. (a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर): पूर्व, 0.500 कि.मी. Beat No. (बीट क्र.):

(b) Address (पत्ता): तलाठी कार्यालय सजा जामनेर येथे, जामनेर,जामनेर

(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):

District (State) (जिल्हा (राज्य)): (महाराष्ट्र)

6.



Scanned with OKEN Scanner

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):

(a) Name (नाव): श्री.हेमंत खंडु नागरे

(b) Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):

(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष): 1988

(d) Nationality (राष्ट्रीयत्व):भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No. (पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख ): Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) Occupation (व्यवसाय):

(i) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | अँन्टी करप्शन ब्युरो जळगाव, जळगावजळगाव, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | अँन्टी करप्शन ब्युरो जळगाव, जळगावजळगाव, महाराष्ट्र, भारत |

(j) Phone number (फोन नं.):

Mobile (मोबाइल क्र.): 91-7588095296

Scanned with OKEN Scanner

7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):

Accused More Than One (जर आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या): 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | वसी[illegible] रा[illegible] तड[illegible] | | | 1. Town/Village (शहर / गाव): कृष्णतारा नगर प्लॉट नं60 यावल,Tehsil (तहसील): यावल,Police Station (पोलीस ठाणे): जामनेर,District (जिल्हा): जळगाव,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यासाठी विलंब होण्याची कारणे ):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S. No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

10. Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :

11. Inquest Report / U.D. Case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|



Scanned with OKEN Scanner

12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):

पोलीस स्टेशन गुरनं. 05/2026 भ्रष्टाचार प्रति.अधि.1988 कलम 7 प्रमाणे

मुळ तक्रारदार -अमोल प्रकाश पाटील ,वय-35,व्यावसाय-नोकरी,रा-चांगदेव नगर वाकी रोड जामनेर,ता-जामनेर,जि.जळगाव

फिर्यादी-श्री.हेमंत खंडु नागरे पोलीस निरीक्षक अँन्टी करप्शन ब्युरो जळगाव

आरोपीताचे नाव व पत्ता -वसीम राजु तडवी वय -27 वर्ष धंदा - नोकरी तलाठी सजा जामनेर ता.जामनेर जि.जळगाव रा.कृष्णतारा नगर प्लॉट नं.60 यावल ता.यावल जि.जळगाव (खाते-महसुल विभाग वर्ग 3)

अप.घ.ता.वेळ व ठिकाण - दि.07/01/2026 रोजी 13.55 वा चे सुमारास तलाठी कार्यालय सजा जामनेर येथे.

लाचेची मागणी रक्कम -प्रथम 5000 रु.व तडजोडी अंती 4000रु.

स्विकारलेली रक्कम-4000रु.(त्यात 500रु दराच्या 08 चलनी नोटा )अ.पा.लावलेल्या

सापळा अधिकारी -श्री.हेमंत नागरे पोलीस निरीक्षक अँन्टी करप्शन ब्युरो जळगाव

तपास अधिकारी -श्री.योगेश ठाकुर पोलीस उपअधिक्षक अँन्टी करप्शन ब्युरो जळगाव

गुन्ह्याची थोडक्यात हकीकत -यातील फिर्यादी यांनी दि.16/12/2025 रोजी अजय देवराम माळी व ममता अजय माळी याचे कडुन मौजे जामनेर येथे बिनशेती गटनं 387/3/पै मधील प्लॉट नं ९ याचे श्रेत्र 281.88 चौ.मी या प्लॉट जागेपैकी सामाईकातील अविभाज्य हिस्याचे पुर्वेकडील श्रेत्र 140.94 चौ.मी याचा न.पा. घर नं 3201/9/1 ची संपुर्ण बखळ प्लॉट जागा कायम खरेदी केली आहे तसेच माझी पत्नी निकीता अरुण पाटील याच्या नावे राजुल हरेश शहा व ईतर याचेकडुन दि 17/12/2025 रोजी मौजे जामनेर येथील बिनशेती गट नं 395 मधील प्लॉट नं 46 याचे एकुन श्रेत्र 171.19 चौ.मी या प्लॉट जागेपैकी सामाईकातील अविभाज्य हिस्याचे 7/12 कायम ठेवुन तुकडा न पाडता क्षेत्र 143.31 चौ.मी याचा 1542.01 चौ.फुट याचा न.पा. घर नं 3352/46 ची संपुर्ण बखल प्लॉट जागा कायम खरेदी केली होती .

वर नमुन प्लॉटची खरेदी केल्यानंतर तक्रारदार व त्याचे पत्नीने फेरफार नोंद करुन त्या दोघांचे नाव अधिकार अभिलेखात 7/12 उताऱ्यावर दाखळ करण्याकरीता तक्रारदार हे दि.24/12/2025 रोजी तलाठी कार्यालय जामनेर येथील तलाठी श्री तडवी यांना भेटले तेव्हा तलाठी श्री तडवी यांनी तक्रारदार यांच्या कडे 5000/-रु लाचेची मागणी केलेबाबत तक्रारदार यांनी दि.07/01/2026 रोजी ला.प्र.वि. जळगाव घटकाचे सापळा पथकाकडे तक्रार लिहुन दिली होती.

त्या प्रमाणे दि 07/01/2026 रोजी सदर तक्रारीची पडताळणी केली असता तक्रारदार यांनी त्याचे तक्रारीत नमुद केले प्रमाणे तक्रारदार याचे कडेस आ लो से यांनी तक्रारदार व त्याच्या पत्नीने खरेदी केलेल्या बखळ प्लॉटच्या फेरफार नोंद करुन याचे नाव अधीकार अभिलेखात 7/12 उताऱ्यावर दाखल करण्याकरीता प्रथम 5000/- व तडजोडीअंती 4000/- रु लाचेची मागणी करुन सदरची लाच रक्कम पंचासमक्ष स्वता स्विकारली म्हणुन गुन्हा सोबत टंकलिखीत केलेली फिर्याद जोडलेली आहे.

13.



Scanned with OKEN Scanner

Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.
(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):

(1) Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): Murlidhar Madhav Kasar (पोलीस निरीक्षक) or (किंवा):

(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Rank (हुद्दा):

No. (क्र.): to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)

(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला): or (किंवा)

(4) Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा): on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).

F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)

R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी) पोलीस ठा अमलदार जामनेर पो स्टे जि जळगाव

Name (नाव): Murlidhar Madhav Kasar

Rank (हुद्दा): I (Inspector)

No. (क्र.): PI

07/01/26

14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):



Scanned with OKEN Scanner

फिर्याद जामनेर पो.स्टे., जळगाव.

दि.०७/०१/२०२६

मी हेमंत खंडु नागरे, वय ३८ वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जळगाव. मो.नं. ७५८८०९५२९६.

सरकारतर्फे फिर्यादी होवुन फिर्याद लिहुन देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जळगांव येथे मागील ०६ महीन्यापासुन पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे.

दिनांक ०७/०१/२०२६ रोजी तक्रारदार श्री.अमोल प्रकाश पाटील, वय ३५ वर्षे धंदा नोकरी रा. जामनेर, जि.जळगांव यांनी पोलीस उप अधिक्षक श्री. योगेश ठाकुर यांना फोनद्वारे संपर्क साधुन त्यांची एका लोकसेवकाविरुध्द लाचेसंबंधी तक्रार असल्याचे सांगुन जामनेर शहराच्या अलीकडे जामनेर ते जळगांव रोडवरील बालाजी पार्क समोरील मोकळया जागेत भेटणार असल्याचे त्यांनी सांगीतले होते. पोलीस उप अधिक्षक श्री. योगेश ठाकुर यांनी आम्हांस ला.प्र.वि.च्या कार्यपध्दतीप्रमाणे तक्रारदार यांची भेट घेवुन पुढील कार्यवाही करण्याचे आदेश दिले. त्याप्रमाणे आम्ही मा. विभाग नियत्रंक, रा.प.मं., जळगांव व मा. विशेष लेखा परिक्षक, वर्ग २ सहकारी संस्था,पणन जळगांव यांना पत्र पाठवुन त्यांच्याकडुन पंच उपलब्ध करुन घेतले.

त्यानंतर आम्ही, पोलीस उप अधीक्षक श्री.योगेश ठाकूर, दोन्ही पंच व सापळा पथकातील पोलीस अंमलदार पोना/बाळू मराठे, पोकॉ/ भुषण पाटील यांचेसह सापळा कारवाईसाठी लागणाऱ्या साहित्यासह शासकीय वाहन क्र. एम.एच. १९, ई.ए.६०२१ या वरील चालक श्रेपोउनि सुरेश पाटील, नेमणुक- मोटार परिवहन विभाग, जळगांव यांचेसह ॲन्टी करप्शन ब्युरो, जळगांव कार्यालयातुन रवाना होवुन जळगाव- कुसुंबा-चिंचोली-नेरी या मार्गाने जामनेर शहराच्या अलीकडे जामनेर ते जळगांव रोडवरील बालाजी पार्क समोरील मोकळया जागेत जावुन पोहचलो. सदर ठिकाणी एक इसम उपस्थित होते. त्यास आम्ही शासकिय वाहनात बसवुन घेतले. त्यानंतर आम्ही त्यांस नाव, पत्ता विचारुन खात्री केली असता तो तक्रारदार अमोल पाटील असल्याची खात्री झाली. त्यानंतर आम्ही, तक्रारदार अमोल पाटील यांना पंच, सापळा पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे समक्ष त्यांचे पुर्ण नाव पत्ता विचारता त्यांनी त्यांचे नाव श्री. अमोल प्रकाश पाटील, वय ३५ वर्षे, धंदा-नोकरी, रा.जामनेर, जि.जळगांव असे सांगीतले. तेव्हा आम्ही त्यांना आमची ओळख सांगुन, त्यांची पंच व सापळा पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांची ओळख करुन देवुन पुढील सापळा कारवाई सुरु केली.

आम्ही तक्रारदार अमोल प्रकाश पाटील यांना त्यांचे तक्रारीबाबत सापळा पथकासमक्ष विचारपुस करता त्यांनी सांगितले की,''दिनांक १६/१२/२०२५ रोजी अजय देवराम माळी व ममता अजय माळी यांचेकडुन मौजे जामनेर येथील बिनशेती गट नं. ३८७/३/पै मधील प्लॉट नं. ९ याचे क्षेत्र २८१.८८ चौ.मी. या प्लॉट जागेपैकी सामाईकातील अविभाज्य हिश्याचे पुर्वेकडील क्षेत्र १४०.९४ चौ.मी. याचा न.पा. घर नं. ३२०१/९/१ ची संपुर्ण बखळ प्लॉट जागा कायम खरेदी केली आहे तसेच माझी पत्नी निकीता अरूण पाटील यांच्या नावे राजुल हरेश शहा व इतर यांचेकडुन दिनांक १७/१२/२०२५ रोजी मौजे जामनेर येथील बिनशेती गट नं. ३९५ मधील प्लॉट नं. ४६ याचे एकुण क्षेत्र १७१.१९ चौ.मी. या प्लॉट जागेपैकी सामाईकातील अविभाज्य हिश्याचे ७/१२ कायम ठेवुन तुकडा न पाडता क्षेत्र १४३.३१ चौ.मी. याचा १५४२.०१ चौ.फुट याचा न.पा. घर नं. ३३५२/४६, ची संपुर्ण बखळ प्लॉट जागा कायम खरेदी केली आहे.

वर नमुद प्लॉटची खरेदी केल्यानंतर माझे व पत्नीचे फेरफार नोंद करून आमचे नाव अधिकार अभिलेखात, ७/१२ उताऱ्यावर दाखल करण्याकरीता मी दि.२४.१२.२०२५ रोजी तलाठी कार्यालय, जामनेर येथील तलाठी तडवी साहेब यांना भेटलो. तेव्हा तडवी साहेब यांनी माझेकडे ५,०००/- रु लाचेची मागणी केलेबाबत सांगितले व त्यांची तक्रार स्व:हस्ताक्षरात सविस्तर लिहुन दिली होती.'' त्यावर तक्रारदार अमोल पाटील, आम्ही तसेच दोन्ही पंचांनी सहया केल्या होत्या.

जामनेर पो.स्टे. गुरनं ०५/२०२६ भ्रष्टा. प्रति. अधि. सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे CCTNS इंट्री क्र. २१ वर 21:00 वाजता दाखल.

[signature]

पोलीस ना अंमलदार जामनेर पो स्टे जि जळगाव

[signature] 07/01/26

सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचमागणी पडताळणी कारवाई करावयाची असल्याने आम्ही तक्रारदार अमोल पाटील व पंच क्र.१ श्री.किरण दुसाने यांना योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर आमचे सुचनेप्रमाणे पोना/बाळु मराठे यांनी नविन मेमरीकार्ड काढुन ते डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये टाकुन ते सुरु करुन तक्रारदार अमोल पाटील यांचे शर्टचे आत गळयामध्ये लटकवुन देवुन तक्रारदार यांचेकडील ई-बाईकने रवाना केले होते.

तक्रारदार अमोल पाटील व पंच क्र.१ श्री किरण दुसाने हे सापळा पथकाजवळ परत आल्यानंतर पोना/बाळु मराठे यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद केले. आम्ही पंच क्र.१ व तक्रारदार यांना घडलेली हकीकत विचारली असता त्यांनी ती कथन केली. त्यानंतर आम्ही सापळा पथकासमक्ष तक्रारदार व तलाठी श्री. तडवी यांचे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकले. सदर संभाषणामध्ये तलाठी श्री तडवी हे तक्रारदार यांना **सांगितले होते न त्या दिवशी** असे म्हटले असता त्यावर तक्रारदार हे **थोड कमीत कमीमध्ये करा..** असे म्हटले असता त्यावर तलाठी श्री. तडवी यांनी **ते सर्वांनी मागीतले भाउ, त्यांनी परवानगी करण्यासाठी** ’’ असे उत्तर दिले, त्यानंतर काहीवेळाने तक्रारदार यांनी **एक काम करा, याचे दोघांचे राहु दया याचे नोंदवुन घ्या** असे म्हटले असता त्यावर तलाठी श्री तडवी यांनी **याचे नको दया फार तर मला** असे म्हटले त्यावर तक्रारदार यांनी **याचे किती मग..**असे विचारले असता, तलाठी श्री तडवी यांनी **पाच देवुन दया मला** असे म्हटले तेव्हा तक्रारदार यांनी **काही कमी करा** असे म्हटल्यावर तलाठी श्री तडवी यांनी **एक काम करा चार दया,** असे म्हणुन तक्रारदार यांचेकडुन ४,०००/- रुपये स्विकारण्यास संमती दर्शवुन लाचमागणी केल्याबाबत खात्री झाली. यावरुन तलाठी श्री तडवी यांनी तक्रारदार अमोल पाटील यांचेकडे त्यांचे व त्यांच्या पत्नीचे नाव त्यांनी खरेदी केलेल्या जागेच्या ७/१२ उताऱ्यावर लावुन देण्याच्या मोबदल्यात प्रथम ५,०००/- रुपये व तडजोडीअंती ४,०००/- रुपये लाचेची मागणी केल्याबाबत आमची व सापळापथकाची खात्री झाली होती. तसा सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आलेला आहे.

त्यानंतर आम्ही तक्रारदार अमोल पाटील यांना तलाठी श्री तडवी यांचे मागणीप्रमाणे ४,०००/- रुपये लाच रक्कम देण्यासाठी हजर करण्यास सांगीतले. त्यांनी लाच म्हणुन देण्याकरीता त्यांचे घर खर्चातील ४,०००/- रुपये त्यात ५००/- रुपये दराच्या ०८ चलनी नोटा हजर केल्या. आमचे सुचनेप्रमाणे पंच क्र. २ कृष्णा जाधव यांनी सदर नोटांचे नंबर एका कोऱ्या कागदावर लिहुन घेतले. पोकॉ/भुषण पाटील यांनी सदर लाचेच्या नोटांना ॲन्थ्रासीन पावडर लावुन त्याचे प्रात्यक्षिक करुन दाखवुन सदर नोटा तक्रारदार यांचे शर्टाचे डाव्या बाजुकडील पुढील खिशात व्यवस्थित ठेवुन दिल्या.

त्यानंतर आम्ही तक्रारदार अमोल पाटील व पंच क्र. १ श्री.किरण दुसाने यांचेसह लाचेची रक्कम घेवुन तलाठी कार्यालय, जामनेर येथे पाठविण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर सापळा कारवाई संदर्भात आम्ही तक्रारदार यांचेसह पंच तसेच सापळा पथकास योग्य त्या सचुना दिल्या. त्यानंतर पोना/बाळु मराठे यांनी आमचे सुचनेवरुन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन ते सुरू करून तक्रारदार अमोल पाटील यांचे शर्टाचे आत लावुन देवुन त्यांना तलाठी कार्यालय, जामनेर येथे तक्रारदार यांचे ई-बाईकने रवाना केले व आम्ही सापळा पथकातील सदस्य असे तक्रारदार यांचे ई-बाईकचे मागोमाग रवाना झालो. त्यानंतर तक्रारदार अमोल पाटील व पंच क्र.१ किरण दुसाने असे तलाठी कार्यालय, जामनेर येथे पोहचले. त्यानंतर आम्ही आमचे शासकिय वाहन सदर कार्यालयापासुन काही अंतरावर थांबवुन सदर तलाठी कार्यालयाच्या आजुबाजुस सुरक्षित जागा घेवुन थांबलो. त्यानंतर तक्रारदार यांनी ठरवुन दिल्याप्रमाणे लाच रक्कम स्विकारल्याबाबत सापळा पथकास इशारा केला, ती वेळ १३.५५ वाजेची होती. तेव्हा सदर ठिकाणी आम्ही व सापळा पथकाने तलाठी श्री तडवी यांना ताब्यात घेतले. त्यानंतर लागलीच पोना/बाळु मराठे यांनी तक्रारदार यांचेकडे असलेले डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन ते बंद केले. त्यानंतर ताब्यात घेतलेल्या तलाठी श्री तडवी यांस त्यांचे पुर्ण नाव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे पुर्ण नांव वसीम राजु तडवी वय २७ वर्षे, व्यवसाय नोकरी, तलाठी, सजा

07/01/2026.

Scanned with OKEN Scanner

जामनेर ता.जामनेर जि जळगांव रा.कृष्ण तारा नगर प्लॉट नं.६०, यावल ता.यावल जि.जळगांव असे सांगितले.

तरी दिनांक ०७.०१.२०२६ रोजी लोकसेवक वसीम राजु तडवी वय २७ वर्षे, व्यवसाय नोकरी, तलाठी, सजा-जामनेर ता.जामनेर जि.जळगांव यांनी तक्रारदार अमोल पाटील यांचेकडे त्यांनी व त्यांच्या पत्नीने खरेदी केलेल्या बखळ प्लॉटच्या फेरफार नोंद करून त्यांचे नाव अधिकार अभिलेखात, ७/१२ उताऱ्यावर दाखल करण्याकरीता प्रथम ५,०००/- रूपये व तडजोडीअंती ४,०००/- रूपये लाचेची मागणी करून सदरची लाच रक्कम तलाठी श्री. वसीम तडवी, सजा-जामनेर ता.जामनेर जि.जळगांव यांनी १३.५५ वाजेच्या सुमारास पंच क्र. १ यांचेसमक्ष तलाठी कार्यालय,जामनेर येथे स्विकारली, म्हणुन त्यांचेविरूध्द सरकारतर्फे भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ चे कलम ७ प्रमाणे फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी वाचुन पाहीली ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर टंकलिखीत केलेली आहे.

ही फिर्याद दिली.
दि.०७/०१/२०२६.

07/01/2026.
(PI/Nagare)

समक्ष,

पोलीस ठाणे अंमलदार,
जामनेर पो.स्टे., जळगाव.

Scanned with OKEN Scanner